# सांगली जिल्ह्यातील डाव्या पक्षांचे सामाजिक कार्य

विवेकानंद राजाराम माने इतिहास विभागप्रमुख, क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल जि. सांगली

**प्रस्तावना:**

१८५७च्या उठावानंतर भारतात शिक्षणाचा प्रसार होऊन राजकीय चळवळ उभी राहिली. इंग्रजी शिक्षणाच्या मुशीतून बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडीत, गोपाळ गणेश आगरकर असे अनेक समाज सुधारक निर्माण झाले. आपल्या लेखणीने त्यांनी बालविवाह—प्रतिबंध, विधवाविवाह, केशवपन— प्रतिबंध, स्त्रीशिक्षण यासारख्या विषयांना वाचा फोडली. परंतु या समाजसुधारकांचे कार्य लिहिता—वाचता येणाऱ्या विशिष्ठ वरिष्ठ वर्गापुरते मर्यादित राहिले. सामाजिक सुधारणेचे कार्य लक्षावधी गरीब, अडाणी व शूद्र मानले गेलेले शेतकरी तसेच कामगार, कष्टकरी या वर्गापर्यंत नेण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले. त्यांच्या चळवळीचा वारसा राजर्षी शाहू महाराज, भास्करराव जाधव, केशवराव जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील व क्रांतिसिंह नाना पाटील यांनी चालविला. सांगली जिल्ह्यातील डाव्या पक्षांच्या नेत्यांवर म. फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रभाव होता. साहजिकच समाजातील अज्ञान, विषमता, दारिद्र्य, पिळवणूक दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याचे दिसून येते.

**सांगली जिल्ह्यातील डाव्या पक्षांचे सामाजिक कार्य:**

**१. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे कार्य:**

**साक्षरता प्रसार:**

नाना पाटील यांनी राजकीय चळवळीला प्राधान्यक्रम दिलेला असला तरी त्यांचा मूळचा पिंड सामाजिक कार्यकर्त्याचाच होता. त्यांनी वैयक्तिक जीवनात महात्मा गांधीच्या १४ कलमी कार्यक्रमापैकी साक्षरता प्रसार यामध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या निरक्षर असलेल्या पत्नीला लिहण्यावाचण्यास शिकवून साक्षर केले. खेड्यातील शेतकऱ्यांना साक्षरतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी जिल्हाभर पायी दौरे काढले. तासगाव नजीक मोराळे या गावी त्यांनी प्रौढ साक्षरतेसाठी शाळा काढली. तसेच काही काळ तेथे स्वत: शिकविण्याचेही कार्य केले. पुढे अशा अनेक शाळा जिल्हाभर सुरू झाल्या. प्रौढ साक्षरता प्रसाराची नानांची ही तळमळ पाहून कॉंग्रेसचे प्रौढ साक्षरतेचे एक कार्यकर्ते एस. आर. भागवत यांनी त्यांनी एक सायकल भेट दिली.[१] या सायकलमुळे नानांच्या साक्षरता प्रसाराच्या कार्याला अधिकच गती आली.

**गांधी लग्न पद्धत:**

नाना पाटलांनी जनतेला सावकारशाहीच्या पाशातून वाचविण्यासाठी सत्यशोधकीय विवाहांचे पुनरूज्जीवन करुन लग्नातील खर्चाला फाटा दिला. लग्नातील रूसवे—फुगवे वर्ज्य केले. नवरा—नवरीला खादीचे कपडे व मंगळसूत्र असे मोजकेच साहित्य घेऊन २०—२५ रुपयात लग्ने लावण्यास सुरूवात केली. या लग्नात महात्मा गांधीजींचा फोटो ठेवला जाई. नाना पाटील व त्यांचे मित्र स्वामी रामानंद भारती मंगलाष्टका म्हणत. लग्नानंतर वधू—वर गांधीजींच्या फोटोस नमस्कार करुन देशसेवेसाठी कटिबद्ध राहण्याची शपथ घेत. तसेच गरज पडल्यास आपले अपत्य देशसेवेसाठी देण्याचेही अभिवचन देत. अशा लग्नाला नानांनी 'गांधी लग्न' असे नाव दिले.[२] सर्व विधी झाल्यानंतर नाना पाटील व स्वामी रामानंद भारती यांची भाषणे होत असत. नानांची समाज प्रबोधन करणारी 'गांधी लग्ने' तत्कालीन सातारा जिल्ह्यात फारच लोकप्रिय झाली होती. नानांनी अशी अनेक 'गांधी लग्ने' लावली. तसेच अनेक सामुदायिक विवाहही लावले. लग्नातील धार्मिक विधी नाकारून धार्मिक गुलामगिरीविरुद्ध बंड पुकारून लग्नातील वारेमाप खर्चाला फाटा देऊन सावकारशाहीला आळा घालणे, मानपान टाळून नात्यागोत्यातील संघर्ष कमी करणे आदि हेतू बरोबरच स्वातंत्र्याची चळवळ समाजापुढे तेवत ठेवण्याचे कार्य नाना पाटील साध्य करत होते. त्यांनी स्वत:च्या लग्नात स्वत:च मंगलाष्टका म्हटल्या. आपली बहीण गंगूताई हिचे लग्न कुंडलचे स्वातंत्र्यवीर नाथाजी लाड यांच्याशी 'गांधी लग्न' पद्धतीनेच लावून दिले. लग्नसमारंभात भोजनाच्या समारंभांना नानांचा विरोध होता. परंतु आपल्या घरच्या विवाहप्रसंगी नानांनी पंचक्रोशीतील महार, मांग, चांभार, ढोर आदी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना समाजातील पाटील वगैरे उच्चवर्गीय लोकांबरोबर पंक्तीत बसवून प्रितीभोजनाचा समारंभ घडवून आणला. ते स्वत:ही मागासवर्गीय लोकांच्या पंक्तीला बसले. काही वृद्ध मंडळींनी याला विरोध दर्शविला. परंतु हा थोडासा विरोध वगळता सर्व गावाने दलितांबरोबर सहभोजन घेतले.[३] पुढील काळात त्यांनी एकुलती एक मुलगी हौसाताई हिचे लग्न हणमंतवडियेचे भगवानराव मोरे यांच्याशी 'गांधी लग्न' पद्धतीने जून १९४० मध्ये लावून दिले. अशा प्रकारे त्यांनी आपण खऱ्या अर्थाने सत्यशोधकीय समाजसुधारक असल्याचे दाखवून दिले.

**२. स्त्री—पुरुष समता चळवळ:**

जागतिक पातळीवर १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. त्यानंतरच्या कालखंडात विविध देशातील स्त्री—पुरुष समता चळवळीने गती घेतली. सांगली जिल्ह्यातही विविध डाव्या राजकीय पक्षांच्या महिला संघटना दिर्घकाळ कार्यरत आहेत. त्यामध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या प्रभाताई सूर्यवंशी, लाल निशाण पक्षाच्या गिता ठाकर, समाजवादी पक्षाच्या विद्या स्वरसी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या सुमनताई पुजारी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या रेहाना शेख, श्रमिक मुक्ती दलाच्या इंदुताई पाटणकर, गेल ऑम्वेट यांचा सहभाग दखलपात्र आहे. या महिलांच्या नेतृत्वाखाली असलेल्या संघटनानी स्त्री—पुरुष समता चळवळीचे कार्य प्रभाविपणे सुरु ठेवले. आजही या चळवळी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या दिसून येतात.[४]

**३. डाव्या चळवळीतील सामाजिक उपक्रम—बळीराजा स्मृती धरण:**

खानापूर तालुक्यातील बलवडी (भा.) व तांदूळवाडी या दोन गावाजवळ वाहणाऱ्या येरळा नदीकाठी बळीराजा

स्मृति धरण हे छोटे धरण बांधण्यात आले. हे केवळ धरण नसून ती दुष्काळ हटवण्याची एक चळवळ बनली. १९८२–८३ मधील मुंबई गिरणी कामगारांच्या संपात खानापूर तालुक्यातील गावाकडे आलेले कामगार आणि तालुक्यातील दूष्काळग्रस्त कष्टकरी जनता यांच्या एकजुटीतून मुक्ती संघर्ष चळवळीचा जन्म झाला. १९८६ मध्ये पुरोगामी चळवळीच्या वतीने धरणाची कल्पना मांडण्यात आली. यामधील डॉ. भारत पाटणकर यांची तात्त्विक बैठक व संपतराव पवार यांचे संघटन कौशल्य यामुळे धरणाच्या कामाने वेग घेतला.[५] १६ ऑक्टोबर १९८६ रोजी बळीराजा धरणाच्या प्रस्तावाचे पत्र सांगली जिल्हाधिकाऱ्यांना मुक्तीसंघर्ष चळवळीच्या वतीने देण्यात आले. शासकीय अधिकाऱ्यांचा वाळू विक्री लिलाव पद्धतीने करण्याबाबत आग्रह होता. तथापि परिसरातील ग्रामस्थातील जागृती व चळवळीचा रेटा यामुळे वाळू विक्रीस परवानगी मिळाली.[६] परिसरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ४० दिवस श्रमदान करून धरणाचा पाया खोदला. लोकाश्रय व लोकवर्गणी यातून धरणाचे बांधकामही सुरू झाले. अचानक जिल्हाधिकाऱ्यांनी धरण अनधिकृत ठरवून बांधकाम थांबविण्याचा आग्रह धरला. यानंतर बळीराजा धरण कृती समितीने धरणाच्या मंजूरीसाठी जिल्हा पातळीपासून मंत्रालयापर्यंत संघर्ष सुरू ठेवला. वेगवेगळ्या प्रकारे आंदोलने करून धरण बांधकामाला शासनाची रितसर परवानगी मिळवली. यानंतर पुन्हा धरणाच्या बांधकामास सुरूवात झाली. वाळू विक्रीतून मिळालेला नफा आणि शिवाजी विद्यापीठ कक्षेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे श्रमदान यातून १२८ दिवसात हे धरण पूर्ण झाले. अवघ्या १०–१२ लाख रूपये खर्चाच्या या प्रकल्पाची व्यापक प्रमाणात चर्चा झाली.[७] सप्टेंबर १९८९ मध्ये या धरणात पाणी अडविण्यात आले आणि जुलै १९९० पासून समान पाणी वाटप योजनेची कार्यवाही सुरू झाली. या धरणातील पाणी फिरत्या सिंचन व्यवस्थेमार्फत कोणतेही पैसे न घेता शेतकऱ्यांना पिकासाठी देण्यात आले.[८] यानंतर कृती समितीमध्ये क्रांती स्मृती वनावरून वाद सुरु झाला. त्याचा परिणाम या धरणावर होऊन धरणावर दारे बसविण्याचे काम अपुरे राहिले. अडविलेल्या पाण्याचा पूर्ण उपयोगही केला गेला नाही. त्यामुळे आजही हे धरण अपूर्ण स्थितीमध्ये आहे. संपतराव पवार आणि त्यांचे बलवडीतील समर्थक धरणाच्या संबधित कार्यापासून बाजूला गेले.

**४. क्रांतिस्मृतीवन– डाव्या विचारांच्या नेत्याचा देशभक्तीचा जाज्वल्य प्रयोग:**

बळीराजा स्मृती धरणालगतच क्रांतिस्मृतीवन योजनेची संकल्पना मांडण्यात आली. जानेवारी १९९२ मध्ये मुकुंदराव किर्लोस्कर यांच्या पुढाकाराने पहिली बैठक पुणे येथे केसरी मराठा संस्था, पुणे या संस्थेशी संबंधित असलेले शरदचंद्र गोखले, बा. ना राजहंस, डॉ. अनंत फडके, वासुदेव कुलकर्णीयांच्या उपस्थितीत झाली. या बैठकीला मुक्ती संघर्ष चळवळीचे नेते डॉ. भारत पाटणकर व भाई संपतराव पवार उपस्थित होते. यानंतर क्रांतिस्मृतीवन योजनाची भुमिका व आराखडा मुकुंदराव किर्लोस्कर यांनी तयार केला.[९] बळीराजा धरणाची योजना कार्यवाहीत आणलेली मुक्ती चळवळ समितीही या योजनेत सहभागी झाली.

९ ऑगस्ट १९९२ रोजी चलेजाव चळवळीचा ५०वा स्मृतीदिन देशभर साजरा झाला. या निमित्ताने क्रांतिकारकांची स्मृती जोपासण्याच्या उद्देशाने ही योजना स्विकारण्यात आली. तिला अनेक संस्था, शाळा, व्यक्ती, विद्यार्थी व शिक्षक यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. भाई संपतराव पवार यांच्या पुढाकाराने तांदूळवाडी लगत येरळेकाठी क्रांतिस्मृतीवनाची उभारणी सुरू झाली. प्रत्येक हुतात्म्याच्या नावाने या स्मृतीवनात एकेक वृक्ष लावण्याची अभिनव कल्पना पुढे आली. वैज्ञानिक दृष्टिकोन व भावनिकता यांची सांगड घातली गेल्याने ती सर्व थरातून उचलून धरण्यात आली.[१०] अल्पावधीतच काही हजार झाडे जोमाने वाढली. त्यांच्यावर हुतात्म्यांची नावे झळकू लागली. तथापि १९९८ साली अनपेक्षीतपणे काहीजणांचा योजनेला विरोध सुरु झाला. क्रांतिस्मृतीवनाच्या उभारणीत सहभागी झालेल्या सदस्यात राजकीय व वैचारिक मतभेद उफाळून आले. त्यामुळे क्रांतिस्मृतीवनाचा हा पहिला प्रयोग अयशस्वी झाला.

यानंतर संपतराव पवारांनी बलवडी येथे क्रांतिस्मृतीवन प्रतिष्ठाण स्थापन केले. कोणतीही शासकीय मदत न घेता स्वत:ची १० एकर जमीन या प्रतिष्ठाणला देऊ केली. १ ऑक्टोबर २००० रोजी स्वातंत्रसैनिक धोंडिराम माळी यांच्या हस्ते नव्या क्रांतिस्मृती उभारणीच्या कार्यास प्रारंभ झाला.[११] आदर्श विद्यालय कामेरी येथील विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या क्रांतिस्मृतीवनात भारतीय थोर मातांचे स्मृती जतन करण्यासाठी लावलेल्या वृक्षांची संख्या ५१ आहे. याशिवाय नारळ, लिंब, चिंच, सुरू आदी २५०० वृक्ष आहेत. प्रत्येक झाडाला विशिष्ट नावाने ओळखले जाते. त्या झाडावर छोटे फलक लावलेले आहेत. सर्वच परिसर नैसर्गिकदृष्टया रमनीय बनविला आहे. येथे पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते. महाराष्ट्रातील तसेच देशातील अनेक अभ्यासक, साहित्यिक, विचारवंत या स्थळाला भेट देतात. येथे विविध ज्वलंत विषयावर चर्चासत्रे व व्याख्याने आयोजित केली जातात, विचारांची देवाणघेवाण केली जाते. १९७२ साली इस्लामपूर येथील मोर्चावर गोळीबार झाल्याने चार कार्यकर्ते हुतात्में झाले. याबरोबरच क्रांतिकारकांची आंदोलने व अनेक मोर्चे यांचा साक्षीदार असलेला इस्लामपूर कचेरीसमोरील लिंबाचा वृक्ष वठल्यामुळे तोडण्यात येणार होता. संपतराव पवार यांच्या प्रयत्नाने तो बलवडी येथील क्रांतिस्मृतीवनात नेण्यात आला. त्या लिंबाच्या खोडावर रासायनिक प्रक्रिया करून त्याचे आयुष्यमान वाढवण्याचा प्रयत्न केला आहे.[१२] आज क्रांतिस्मृतीवन हे आदर्श सामाजिक बांधीलकीचे व देशभक्तीचे ठिकाण म्हणून नावारुपाला आले आहे.

**५. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती:**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) चे स्थापनेपासून अध्यक्ष महाराष्ट्रातील डाव्या विचारांचे नेते प्रा. एन. डी. पाटील हे आहेत. अंनिसचे काम नरेंद्र दाभोळकर यांच्या नेतृत्वाखाली १९८९ साली सुरू झाले. सुरवातीस अंधश्रद्धा निर्मूलन कार्याचे ३ विभाग पाडले होते. पहिल्या भागात 'शिक्षणक्षेत्र आणि अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावर पहिली परिषद सातारा येथे झाली. या परिषदेला अण्णासाहेब शिंदे, वि. म. दांडेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. दुसऱ्या भागात 'अंधश्रद्धेच्या बेड्या तोडा अभियान' या विषयावर दोन परिषदा १९९६ व १९९७ साली सातारा येथे झाल्या. तिसऱ्या भागात 'स्त्रीया आणि अंधश्रद्धा निर्मूलन' या बाबतची बैठक सोलापूर येथे झाली.[१३] याच कालखंडात

नरेंद्र दाभोळकर व प. रा. आर्डे यांची अंधश्रद्धा: प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम, श्रद्धा–अंधश्रद्धा या व अशा प्रकारची पुस्तके प्रकाशित झाली. अंधश्रद्धा वार्तापत्र सुरू करून त्यातून वैचारिक लेख लिहून प्रबोधन सुरू केले. यानंतर वैज्ञानिक जाणीवा वाढविणारी प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची शिबीरे मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात आली. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात अंनिसच्या कार्यकर्त्यांचे संघटन होऊन संघटना गतिमान झाली. जेथे अंधश्रद्धेच्या घटना घडल्या तेथे अंनिसच्या कार्यकर्त्यांनी विरोध करून आव्हान दिले. ज्या त्या ठिकाणी तेथील कार्यकर्ते अंधश्रद्धेच्या विरोधी कृती करत होते. सातारा येथे डॉ. दाभोळकर, सांगली येथे डॉ. प्रदीप पाटील, लातूर येथे माधव बावगे तर पुणे येथे मिलिंद देशमुख हे प्रामुख्याने सर्वत्र क्रियाशील होते.[१४] अंनिसचे कार्यकर्ते प्रश्नांना ताकदीने भिडत व वैचारिक प्रबोधनात अग्रभागी असत.

**६. नरेंद्र महाराजाविरुद्ध निदर्शने:**

१९९७ साली नाणीज मठाचे नरेंद्र महाराज यांच्या भोंदूगिरीविरुद्ध शिवाजीराव शिंदे, शंकरराव थोरबोले, हणमंतराव रेंधाळकर, बाजीराव जाधव या शेकापच्या कार्यकर्त्यांनी तासगाव शहरात व तालुक्यात लोकजागृती करून महाराष्ट्रात पहिल्यांदाच निदर्शने करून त्याला पळवून लावले. अक्षरशः नरेंद्र महाराजांनी पलायन करीत असताना शेतकरी कामगार पक्षाचे नेते पाठलाग करीत होते. तर शहरवासीय शहर बंद ठेवून हा पलायनाचा खेळ पाहत होते.[१५]

**७. वास्तुतज्ञांना विरोध**:

आनंद पिंपळकर व रविराज अहिरराव असे दोन मोठे वास्तुशास्त्री महाराष्ट्रामध्ये वास्तुशास्त्राचा महिमा सांगत फिरत होते. कधी मोफत तर कधी तिकीटावर मनोरंजनाच्या नावाखाली एकपात्री नाट्यप्रयोगाचे प्रमाणपत्र घेवून मोठ्या शहरात कार्यक्रम लावायचे. या कार्यक्रमातून गिऱ्हाईक शोधायचे आणि आपल्याकडील वस्तू भरमसाठ किंमतीत विक्री करायचे. अशी पद्धत ही मंडळी वापरत होती. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी या वास्तुतज्ञांच्या कार्यक्रमांना विरोध केला. २००४ साली आनंद पिंपळकर यांना संतती प्राप्तीसाठी उपाय सांगताना कोल्हापूरच्या कार्यकर्त्यांनी रंगेहाथ पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.[१६] .त्यामुळे सुमारे वर्षभर सांगली–कोल्हापूर परिसरात वास्तुशास्त्री फिरकले नाहीत. २००६ साली पुन्हा आनंद पिंपळकरांनी कोल्हापूरात आपला आनंदी वास्तू कार्यक्रम ठेवला. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी आनंद पिपळकरांची कार्य पद्धती कोल्हापूर पोलिस कमिशनरांना दिली. त्यांना ती पटली. यानंतर रविराज अहिरराव यांचा वास्तुरविराज कार्यक्रम जाहीर झाला. अंनिसच्या कार्यकर्त्यानी या कार्यक्रमाला विरोध केला. मंत्रालयातून फोनाफोनी झाली आणि पोलिसांनी अहिररावांना कार्यक्रमासाठी परवानगी दिली. प्रचंड पोलीस बंदोबस्तात कार्यक्रम पार पडला, कार्यकर्त्यांच्या भुमिकेमूळे कार्यक्रमाला प्रेक्षक ५४ आणि बंदोबस्तासाठी पोलिस ५० अशी स्थिती निर्माण झाली. दुसऱ्या दिवशी १८ मार्चला इस्लामपूर येथे रविराज यांचा कार्यक्रम येथील काही शिक्षक मंडळींनी ठेवला. अंनिसच्या कार्यकर्त्यानी अहिरराव यांच्याविरूद्ध रितसर फिर्याद इस्लामपूर पोलीस स्टेशनला केली. यानंतर बरीच वादावादी होउन कार्यक्रम झाला. परंतु अंनिसच्या कार्यकर्त्याच्या भुमिकेमूळे प्रेक्षकांनी कार्यक्रमाकडे पाठ फिरवली.[१७]

**८. एकतर्फी प्रेमप्रकरणाला विरोध:**

१९९१–९२ मध्ये सांगली जिल्ह्यात एकतर्फी प्रेमप्रकरणातून अनेक मुलींचे खून झाले. अमृता देशपांडे (सांगली), आरती जोशी (शिराळा), शोभा तांदळे (इस्लामपूर), शशिकला ओझा (मिरज) या मुलींना आपले प्राण गमवावे लागले. या प्रकरणात जिल्ह्यातील डाव्या चळवळीतील विद्यार्थी, युवक संघटना, तसेच पक्षांनी एकत्र येऊन मोर्चे काढले व आरोपींना कडक शासन करा अशी मागणी केली.[१८] या मागण्यांची दखल घेऊन पोलिसांना तपासकार्य गतीने करणे भाग पडले.

**९. जातिअंत संघर्ष समितीचे कार्य:**

२००६ मध्ये तामिळनाडू येथील एका गावात गावकऱ्यांनी दलित वस्ती व गाव यांच्यामध्ये भिंत बांधली व दलितांशी संपर्क तोडून टाकला. तेथील मा.क.पक्षातील कार्यकर्त्यानी आंदोलन करून ती भिंत पाडून टाकली. या घटनेची प्रतिक्रिया देशभर उमटून दलित–सवर्ण संघर्ष सुरु झाला. जिल्ह्यात या घटनेचा निषेध करण्यात येऊन जातिअंत संघर्ष समिती स्थापन करण्यात आली. या समितीत डॉ. भारत पाटणकर, गौतमीपुत्र कांबळे, उमेश देशमुख, गौतम लवटे, धनाजी गुरव, यांचा समावेश होता. या समितीने आंतरजातीय विवाह मदतकेंद्र स्थापन करून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले. जिल्ह्यात अनेक ठिकाणी जात पंचायती अस्तित्वात होत्या. त्यांच्या संदर्भातील आलेल्या तक्रारींचे निवारण संबंधित ठिकाणी जाऊन समितीने सोडविले. तसेच जिल्ह्यात जातिवाचक शिवीगाळ करणारी प्रकरणे जागेवर जावून त्यासंबंधीचे वाद–विवाद मिटवण्याचे कार्य केले.[१९]

**निष्कर्ष :**

नाना पाटील यांनी साक्षरता प्रसार सत्यशोधकीय विवाहांचे पुनरूज्जीवन यामध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे. जिल्ह्यातही विविध डाव्या राजकीय पक्षांच्या महिला संघटना स्त्री–पुरुष समता चळवळीत दिर्घकाळ कार्यरत राहिल्या आहेत. येरळा नदीकाठी बळीराजा स्मृति धरणाच्यानिमित्ताने छोटे धरण प्रकल्प, दुष्काळ पर्यावरण, पाणीवाटप यासारख्या अनेक प्रश्नांचा उहापोह झाला. क्रांतिस्मृतीवन या योजनेचे प्रणेते संपतराव पवार यांची हे एक चांगले संस्कार केंद्र व प्रेरणा स्थळ बनावे अशी भूमिका होती ती पूर्ण झालेली दिसून येते. सांगली जिल्ह्यात अंनिसच्या कार्यकर्त्यांचे संघटन होऊन संघटना गतिमान झाली. अंनिसचे कार्यकर्ते प्रश्नांना ताकदीने भिडत व वैचारिक प्रबोधनात अग्रभागी असलेले दिसून येतात.

**संदर्भः**


१) पाटील उत्तमराव व लाड अप्पासाहेब, क्रांतिवीर देशभक्त नाना पाटील, उषा प्रकाशन, औंध, १९४७, पृ. ३३
२) यादव सुमीत, क्रांतिसिंह नाना पाटील—जीवन व कार्य, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा, २०१४, पृ. १०१
३) कित्ता, पृ. १०२
४) मुलाखतः रेहाना शेख, सांगली, दि. ३०/११/२०१५
५) दै. सकाळ, कोल्हापूर, दि. ३०/१/१९९९, पृ. ५
६) मुलाखतः डॉ. भारत पाटणकर, कासेगाव, दि. ३/१२/२०१५
७) दै. श्रमिक विचार, सांगली, दि. २६/४/१९८७, पृ. ५
८) मुलाखतः डॉ. भारत पाटणकर, कासेगाव, दि. ३/१२/२०१५
९) उगम फाऊंडेशन, बलवडी (भा.),संचलित क्रांतिस्मृतीवन वाटचाल पुस्तिका, पृ. ४
१०) दै. सकाळ, कोल्हापूर, दि. १५/१०/१९९५, पृ. १०
११) उगम फाऊंडेशन, उपरोक्त, पृ. ६
१२) दै. सकाळ, कोल्हापूर, दि. १४/४/२००७, पृ. ३
१३) अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र, डॉ. दाभोळकर प्रथम स्मृती विशेषांक, ऑगस्ट—सप्टेंबर २०१४, पृ. २३
१४) कित्ता पृ. २४
१५) मुलाखतः डॉ. बाबुराव गुरव, तासगाव, दि. १२/११/२०१५
१६) दै. सकाळ, कोल्हापूर, दि. ११/१/२०११, पृ. ५
१७) दै. सकाळ, कोल्हापूर, दि. १८/३/२०१२, पृ. ३
१८) दै. पुढारी, कोल्हापूर, दि. ५/४/१९९२, पृ. ५
१९) मुलाखतः डॉ. बाबुराव गुरव, तासगाव, दि. १२/११/२०१५